## दिवाणी किर. अर्ज नं. १४२/२०२० मधील नि.२७ खालील आदेश

**CNR : MHSN06001872-2020**

## (सुनंदा भोसले वि. अनुसया काळे आणि इतर)

युक्तीवाद ऐकला, अभिलेखाची पाहणी केली. सदरचा दावा हा वादी यांनी प्रतिवादी यांचे कडून सरस-निरस मानाने तुटक वाटप होऊन कब्जेत मिळणेकरीता, तसेच जाहीर होऊन मिळणेकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. १७ लक्ष्मीबाई बाळासो शिंदे हया दि. ०३.१२.२०२० रोजी दानेळी येथे मयत झाल्यामुळे, प्रतिवादी क्र.१७ यांचे वारस ९० दिवसाच्या आत अभिलेखावर आणता आले नाही. वारस अभिलेखावर आणणेसाठी वादींना अंदाजे ८ महिने, ७ दिवसांचा विलंब झालेला आहे. वादी यांना कौटुंबीक अडचणीमुळे तसेच देशातील कोविड-१९ या रोगाच्या महामारी आजारामुळे प्रतिवादी क्र.१७ यांच्या वारसांची मुदतीत पुर्तता करता आली प्रतिवादी क्र.१७ यांचे विरुध्द सदरचा दावा अबेट झालेला आहे. वादी यांनी हेतु पुरस्सर प्रतिवादी क्र.१७ यांचे वारस रेकॉर्डवर आणणेस विलंब केलेला नाही. प्रतिवादी क्र.१७ यांचे वारसांना या कामी सामील करुन घेतलेस प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट प्रतिवादी क्र.१७ यांचे चे वारस रेकॉर्डवर न घेतलेस वादीचे नुकसान होणार आहे. तसेच सदरचा दावा हा वाटपाकरीता असल्याने सर्व वारस रेकॉर्डवर घेणे आवश्यक आहे. वारस रेकॉर्डवर न घेतलेस सदर कामी तांत्रिक अडचण निर्माण होणार आहे. म्हणून वादी यांनी प्रतिवादी क्र.१७ यांचे वारस रेकॉर्डवर आणणेस परवानगी मिळणेसाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

०२. सदर अर्जास प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल करुन आक्षेप नोंदविला. ते कथन करतात की, सदरचा अर्ज मान्य व कबुल नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर करणेत यावा अशी विनंती केली आहे.

**०३.** दाव्याचे स्वरुप लक्षात घेता, प्रतिवादी क्र. १७ वारसांना सदरचा दावा चालविण्याचे व त्यांचे म्हणणे लक्षात घेण्याची संधी देणे न्यायोचीत वाटत आहे. प्रतिवादी क्र. १७ यांचे वारस रेकॉर्डवर आणणेस ८ महिने पेक्षा जास्त विलंब झालेला दिसून येत आहे. दाव्याचे स्वरुप व नैसर्गिक न्यायतत्व लक्षात घेता सदरचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सदर अर्ज दाखल करण्यास झालेल्या विलंबाचा कालावधी बाबत खर्चाच्या रक्कमेसह आदेशीत करणे न्यायोचीत वाटत आहे. म्हणुन मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

**०१.** वादी यांचा अर्ज र.रु. २००/- च्या खर्चावर मंजुर करण्यात येत आहे.

**०२.** वादी यांनी मयत प्रतिवादी नं. १७ यांचे वारस अभिलेखावर आणावे. त्या अनुषंगाने दाव्यामध्ये आज पासून १४ दिवसाच्या आत नि. क्र. १ वर दुरुस्ती करावी.

सही/-

(श्रीमती एम. एस. मनगुळी)

दि.१४.०२.२०२२ दुसरे सह.दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मिरज.

**ERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S.P. Patil |
| Court | : | II$^{nd}$ Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Miraj. |
| Date of Decision | : | 14/02/2022 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 15/02/2022 |
| Judgment/Order uploaded on | : | 15/02/2022 |